मुंबई सकाळ TODAY
सोमवार, ११ मे २०१५

**Meri Vaani App for Speech Therapy**

By Harshada Parab

Mumbai May 10: When babies start babbling it is like music to parents ears. Children develop language by listening and speaking. Children with Autism, Cerebral Palsy and Dyslexia suffer from communication difficulties. Children with communication difficulties require various types of therapies. Apps based therapies can be a helpful tool to treat communication difficulties in children with communication difficulties. Specially to help children with communication difficulties " Meri Vaani" app will be launched for Indian market on [June 1st]. Therefore it is important that professionals are available at hand to solve parents queries or range of topics. Such expertise is less in Maharashtra but the children suffering with communication difficulties are more. In order to address these issues an international conference was conducted at Mumbai by Neurogen hospital (Dr. Alok Sharma).

Speech Therapy is not something that is done in one session but requires patience and dedication. Cost, time and getting quality speech therapy services are common problems in most of Indian cities. In order to address all these issues apps have been used and recommended commonly in other countries as reported by Speech Therapist from Ireland, Mr. Milind Sonawane, working at St. Josephs foundation. Mr. Milind Sonawane informed that speech therapy apps are commonly used overseas to help children struggling with speech problems.

Mr. Milind informed that there are 100's of apps in the app market but Meri Vaani is going to be launched in Hindi for the Indian Market on [June 1st] to target Indian population. The app is made by a company called Neuro Hero. This app can be downloaded free with 10 words initially. The app is also available in [English and Spanish language. "The natural ability of children to be attracted with the technology to communicate is the core of using apps in therapy" said Mr. Sonawane.

International conference also highlighted the use of aquatic therapy for the treatment of children who have posture and movement difficulties as reported by Dr. Susan. Communication therapy session was conducted in the swimming pool. Water helps to support the body's weight and improves posture. Therapy helps children to improve balance and coordination reported specialists.

# स्पीच थेरपीसाठी मेरी वाणी

## मुलांना ॲप उपयुक्त ठरत असल्याचा तज्ज्ञांचा दावा

हर्षदा परब : सकाळ वृत्तसेवा

**मुंबई, ता. १० : लहान मुलांचे बोबडे बोल हा आई-बाबांसाठी अत्यंत कौतुकाचा विषय असतो. बोलण्यातून आणि ऐकण्यातून मुलांचा विकास होतो. पण ऑटीझम, सेरिब्रल पॉल्सी, डिसलेक्सिया या आजारांनी ग्रस्त मुलांना बोलण्यात अडचणी येतात. ही अडचण दूर करण्यासाठी 'ॲप' अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे थेरपिस्टनी सांगितले. खास भारतीय मुलांसाठी 'मेरी वाणी' ॲप ११ मे रोजी भारतात दाखल होणार आहे.**

**देशात अशी अनेक मुले आहेत ज्यांना वेगळ्या पद्धतीने मदत करण्याची गरज आहे. पालकांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात असे तज्ज्ञ फार कमी आहेत आणि मुलांची संख्या अधिक आहे. त्यासाठी हा आंतरराष्ट्रीय परिसंवाद घेण्यात आला.**

**- डॉ. अलोक शर्मा**

(संचालक, न्युरोजेन रुग्णालय)

स्पीच थेरपी ही ठराविक सेशनमध्ये होणारी गोष्ट नाही. त्यासाठी जिद्द आणि चिकाटी लागते. मुलांना बोलण्याचा सराव करावा लागतो. स्पीच थेरपिस्टकडे सतत जाणे शक्य होत नाही. पैसे आणि वेळ तसेच स्पीच थेरपिस्टची भेट घेण्याबाबत बऱ्याचदा अडचणी येतात. यासाठी ॲप उपयुक्त ठरत असल्याचे आयर्लंडमधील सेंट जोसेफ फाऊंडेशन संस्थेतील स्पीच थेरपिस्ट डॉ. मिलिंद सोनावणे यांनी सांगितले. परदेशात स्पीच थेरपिस्टच्या मार्गदर्शनाबरोबर अशा पद्धतीच्या ॲपचा आधार मुलांची स्पीच थेरपी विकसित करण्यासाठी घेण्यात येत आहे, असे डॉ. सोनावणे यांनी सांगितले.

डॉ. सोनावणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्पीच थेरपीसाठी बाजारात हजारो ॲप आहेत. तरीही खास भारतीय मुलांना उपयुक्त ठरेल असे 'मेरी वाणी' हे ॲप ११ मे रोजी भारतात दाखल होणार आहे. 'न्युरोहिरो' या कंपनीचे हिंदी भाषेतील हे ॲप आहे. सुरुवातीला १० वेळा ते मोफत डाऊनलोड करता येईल. या आधी ते इंग्रजी, डच, पोर्तुगीज आदी भाषांत होते. यात एका वस्तूशी निगडित शब्द, त्या वस्तूशी निगडित आवाज, त्या वस्तूचा उपयोग अशा अनेक बाबी यात आहेत. डॉ. सोनावणे यांनी दिलेल्या माहितीनुसार मुलांमधील तंत्रज्ञानाची असलेली ओढ ॲपच्या वापरात मदत करते. त्यांना बोलणे शिकण्यात याचा मोठा फायदा होतो. न्युरोजेन रुग्णालयाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत या ॲक्विटिक थेरपीबद्दल माहिती देण्यात आली. तोल जाण्यामुळे, मान स्थिर राहत नसल्यामुळे काही आजारांत मुलांना इच्छा असूनही बोलता येत नाही. अशा मुलांसाठी ही थेरपी अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे डॉ. सुझन यांनी सांगितले. यामध्ये मुलांना पाण्यात नेऊन त्यांना बोलण्याचे प्रशिक्षण देण्यात येते. पाण्यामुळे शरीराला विशिष्ट पद्धतीने आधार मिळतो. या थेरपीमुळे मुलांच्या शरीराला आरामही मिळतो, असे तज्ज्ञांनी सांगितले.